मराठी साप्ताहिक

# युवाशक्ती एक्सप्रेस

RNI No. MAHMAR/2016/72543




रुबिना मुल्ला
कार्यकारी संपादिका
9890879757

वर्ष ७वे | अंक :२१ | रविवार दि.२४ ऑगस्ट ते शनिवार ३० ऑगस्ट २०२५ | किंमत रू. १/- | पृष्ठ : ४

पान २ संपादकीय — माझे श्वासांचे प्रयोग...
पान ३ — सावंत मेहरबान, झा झाला पहलवान...
पान ४ — वसईत मनसे नेते अविनाश जाधव...

## वसई-विरारचा मानवनिर्मित महापूर : पावसाने नाही, भ्रष्टाचाराने शहर बुडवलं – VVMC मुख्यालयासह

१९ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या मुसळधार पावसाने वसई-विरार शहराचे जनजीवन ठप्प झाले. अवघ्या काही तासांत प्रमुख रस्त्यांचे रूपांतर नदीत झाले. नालासोपारा पूर्व-पश्चिम, विरार पूर्व, वसई गाव, पेल्हार, आचोळे, वाळिव नाका, चंदनसार आणि बोळिंज या भागांमध्ये पाण्याचा सर्वाधिक तडाखा बसला. सोसायट्या, दुकाने, रुग्णालये, शाळा जलमय झाली. अनेक ठिकाणी कंबरभर पाणी साचले. शेकडो गाड्या पाण्यात अडकून बुडाल्या. घरगुती साहित्य व व्यापारी मालसामान वाहून गेला. रुग्णवाहिका व शाळा बस तासन्तास पाण्यात अडकून राहिल्याने लहान मुलांना व रुग्णांना मोठे हाल सोसावे लागले. नागरिकांच्या मते ही परिस्थिती नैसर्गिक नव्हती तर महापालिकेच्या



नालेसफाई भ्रष्टाचारामुळे निर्माण झालेली मानवनिर्मित आपत्ती होती. दरवर्षी पावसाआधी नालेसफाईसाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च दाखवला जातो. गाळ उपसा, ट्रक भाडे, कामगार खर्च याची प्रचंड बिलं मंजूर होतात. कागदावर शेकडो ट्रक दाखवले जातात; मात्र प्रत्यक्षात नाले अजूनही गाळाने तुडुंब भरलेले दिसतात. जमिनीवर काम शून्य आणि कागदावर कोट्यवधी रुपयांचा व्यवहार चालतो. या कागदी सफाईमुळेच दरवर्षी नागरिकांना महापुराचा फटका बसतो. यावर्षीही नेमके तेच घडले. पूरग्रस्त नागरिकांचा आक्रोश उफाळून आला आहे. अनेकांनी थेट महापालिकेला आणि भ्रष्ट कंत्राटदारांना जबाबदार धरले. ‘आम्ही कर भरतो पण वर्षातून एकदा पूरात बुडतो’, ‘पावसाने नाही, भ्रष्टाचाराने आम्हाला डुबवलं’, ‘नालेसफाई फक्त निविदा आणि बिलांपुरतीच होते’, अशा प्रतिक्रिया देत नागरिकांनी रोष व्यक्त केला.

पान नं.२वर

### मध्यरात्री अवैध बारवर आमदार दुबे यांचा सडेतोड हल्ला

## दत्ताणी मॉलमध्ये पहाटेपर्यंत डीजेचा गोंधळ  पोलिस-प्रशासनाला जाब

वसईच्या दत्ताणी मॉल परिसरात दोन अवैध बार – ‘विंग्स ऑन फायर’ आणि ‘पंखा फास्ट’ – पहाटे २.३० नंतरही सुरू असल्याचे समोर आले. जोरदार डीजे, मद्यधुंद तरुणांचा गोंधळ आणि प्रशासनाची बेफिकिरी यामुळे नागरिक हैराण झाले. यावेळी आमदार स्नेहा दुबे-पंडित यांनी स्वतः धडक मारत पोलिसांना कारवाईस भाग पाडले.घटनास्थळी आमदारांचा धडकाविशेष पाहणीदरम्यान आमदार दुबे थेट घटनास्थळी दाखल झाल्या. रात्री २.३५ च्या सुमारास त्या बारसमोर पोहोचल्या आणि पोलिसांना तात्काळ तक्रार नोंदवण्याचे, तसेच व्यवसाय बंद करण्याचे आदेश दिले.आमचा कोणत्याही वैध व्यवसायाला विरोध नाही. मात्र कायद्याची पायमल्ली करून मध्यरात्रीनंतर चालणारे बार कधीही सहन केले जाणार नाहीत. कारवाई ठामपणे केली जाईल.’ - आमदार स्नेहा दुबे

या धडक छाप्यात महापालिका कर्मचारी



आणि पोलीस अधिकारी कोकणे व बेलकर हेही बारच्या समर्थनार्थ असल्याचा संशय व्यक्त झाला. दरवाजा उघडून न दिल्यामुळे काही काळ अवैध व्यवसाय सुरू ठेवण्यात आल्याचे उघड झाले. आमदार दुबे यांनी याबाबत सखोल चौकशी व कठोर कारवाईची मागणी केली.या घटनेतून स्पष्ट झाले की,ठरावीक वेळेनंतरही सुरू राहणारे बार हा कायद्याचा भंग आहे.पोलिस आणि प्रशासनाची निष्क्रियता नागरिकांच्या सुरक्षिततेस धोकादायक ठरते.अशा वेळी लोकप्रतिनिधींनाच पुढे यावे लागते, ही बाब चिंताजनक आहे.

### धोकादायक नाल्याच्या स्लॅबवर ठेकेदाराचे कार्यालय

## ९ प्रभाग व २० झोनचा औषधफवारणी ठेकेदार ठरला ‘व्हीआयपी’

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती आय विभागाने चिमाजी आप्पा मैदानालगतच्या नाल्यावरील स्लॅब धोकादायक ठरवत त्याचा वापर करू नये, असा आदेश काही दिवसांपूर्वी काढला होता. परंतु हा आदेश केवळ कागदावरच राहिला असून वास्तवात त्याची प्रचितीच उलटी दिसत आहे. कारण, त्याच धोकादायक स्लॅबवर खानावळ, खाऊगल्ला निर्धास्तपणे सुरू आहे. एवढेच नव्हे तर याच स्लॅबवर महापालिकेच्या ९ प्रभाग व २० झोनमध्ये औषधफवारणीचा ठेका




घेतलेल्या ठेकेदाराचे कार्यालय चालू असल्याचे उघड झाले आहे.या ठेकेदाराच्या कार्यालयात दररोज औषधफवारणीसाठी नियुक्त शेकडो मजूर उपस्थिती लावण्यासाठी जमा होतात. फवारणीसाठी लागणारे मोठे पंप, यंत्रसामग्री, तसेच ज्वलनशील रसायनांचा साठा देखील याच कार्यालयात ठेवण्यात आला आहे. आधीच कमकुवत झालेल्या स्लॅबवर एवढे वजन, एवढी

पान नं.२वर

# संपादकीय...!

## माझे श्वासांचे प्रयोग

मी श्वासांच्या साहाय्याने व्हॉईस पर्कशन, व्होकल पर्कशन, ब्रेथ पर्कशनचे नवनवे प्रयोग करायला प्रारंभ केला. माझ्यावर लहानपणी आर. डी. बर्मन यांच्या संगीताचा जो प्रभाव होता, त्याचं वेगळं रूप म्हणजे हे श्वासांचे प्रयोग होते.'ऱ्हीधून' सगळीकडे गाजू लागला. अनेकांच्या तो जिव्हाळ्याचा, आवडीचा भाग झाला. फॅशन जगतात, सिने जगतात त्याची धूम उडाली होती. अनेक फॅशन शोजमध्ये 'ऱ्हीधून'मधले पीस वाजत असत. त्याचे जर कॉपीराईटचे पैसे घेतले असते, तर मी अतिश्रीमंत झालो असतो. सिनेक्षेत्रातला माझा मित्र संजय लीला भन्साळी याला 'ऱ्हीधून' आवडायचा. एकदा तो मला म्हणाला, 'माधुरी दीक्षित आणि ऐश्वर्या रायचं फोटोशूट केलं त्यावेळी मागे पार्श्वभूमीला 'ऱ्हीधून'मधला नंद मी लूपमध्ये वाजता ठेवला होता.' 'देवदास'चं एक गाणं होतं, 'मोरे पिया'; त्याचा ऱ्हीदम त्यानं मला करायला सांगितला होता, त्या गाण्यापाठोपाठ पारोची आई नृत्य करते असं दृश्य होतं, त्यावेळी त्यानं मला 'ऱ्हीधून'मधल्या 'जी जी ऱ्ही'च्या आधारावर काही रचना करायला सांगितली होती. देवदास व पारो जेव्हा पहिल्यांदा भेटतात, त्यावेळी एक भंवरा नृत्य आहे, त्यासाठी संजयने सांगितलं 'ईअर टू देअर'चा पीस घेऊ या, पण तो तू पुन्हा नव्याने तयार कर. अशा किती तरी गोष्टी आठवणीच्या कोशात आहेत.याच काळात मी झेंबेकडे वळत होतो. झेंबेच्या वळणाकडे जाण्याआधी मला आणखी दोन गोष्टी सांगायच्या आहेत. त्यातली पहिली म्हणजे आम्ही केलेला एक नवा प्रयोग 'मुंबई स्टँप' आणि दुसरी गोष्ट म्हणजे माझे विद्यार्थी. मी यापूर्वीच तुम्हाला सांगितलंय की माझा ओढा हा तबल्याबरोबरच अन्य तालवाद्यांकडे होता. जगभरात कुठे कुठे काय काय चाललं आहे, याकडे माझं लक्ष होतं. त्यात झाकीरभाई भारतात आले की येताना कधी माझ्या सांगण्यावरून तर कधी आपणहून वेगवेगळी वाद्ये माझ्यासाठी आणत असत. त्यांनीच मला माझं पहिल ऑक्टोपॅड आणून दिलं होतं, एकदा ते ब्राझीलचं मरिंबा वाद्य घेऊन आले, क्यूबामधला बाता ड्रम्स त्यांनी आणला, झेंबेही त्यांनीच दिला. या पहिल्यावहिल्या गोष्टी मी आजही जपून ठेवलेल्या आहेत. मी एकदा इंग्लंडला गेलो होतो. तिथं मी 'स्टॉम्प वाद्यवृंद' पाहिला. आपल्या दैनंदिन व्यवहारातील वस्तूंमधून त्यांनी वेगळे नाद निर्माण केले होते. वर्तमानपत्र, प्लॅस्टिकच्या बाटल्या, बादल्या, फरशी पुसायचे झाडू अशा कितीतरी गोष्टींच्या आधारे त्यांनी सांगीतिक रचना केल्या होत्या. नवा ऱ्हीदम बनवला होता. त्यांच्या त्या प्रयोगाने मी स्तीमित झालो होतो, प्रभावित झालो होतो.एकदा मी सिंगापूरहून परत येत होतो. तिथली स्वच्छता, टापटिप पाहून छान वाटलं होतं. परतल्यावर विमानातून मुंबईकडे पाहाताना आणि विमानतळाबाहेर पडल्यावर जे कचऱ्याचं साम्राज्य दिसलं, ते पाहिल्यावर मनातल्या मनात मला वाईट वाटलं. आपला देश एवढा समृद्ध असताना आपण आपल्या देशाला इतकं घाण का करतो? स्वच्छता हा एक दागिना आहे, असं म्हणून चालणार नाही, आपण काही तरी करायला हवं. मी संगीतातला माणूस आहे. मग लोकांच्या मनात या विषयाबद्दल जागृती करण्यासाठी मी संगीताचा वापर करायला हवा, या हेतूने विचार करू लागलो. त्यातून जन्म झाला एका नव्या प्रयोगाचा- 'मुंबई स्टँप'चा. यामागे कुठेतरी प्रेरणा होती ती 'स्टॉम्प बँड'ची. आपल्या कचऱ्यामध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टिक असतं, डबे असतात. मग मी प्लास्टिकचे डबे, बादल्या, रंगाचे डबे, घरातले पिठाचे ॲल्युमिनिअमचे डबे, प्लास्टिकच्या पिशव्या असं गोळा केलं. या केवळ वेगवेगळ्या वस्तू नसतात. ती वेगवेगळी प्रतलं असतात, त्यातून आवाज निर्माण होतो. या आवाजाचं 'नादा'त रूपांतर कसं करता येईल यावर मी विचार करू लागलो.अब्बाजींकडून मिळालेली तालविद्या होती. ह्या सर्व गोष्टींवर वाजवायला साध्या लाकडाच्या स्टीक्सही गोळा केल्या, हातात प्लास्टिकच्या पिशव्या घालून वादनाचे प्रयोग केले, त्यातून वेगळा नाद तयार होतो हे लक्षात आलं. मला आणखी एक महत्त्वाची गोष्ट करायची होती, ती म्हणजे या सर्व प्रतलांमधून जो ताल निर्माण होणार तो आमचा ताल असायला हवा, त्यात आमचे सांगीतिक पॅटर्न्स असायला हवेत, आमच्या कोरवाई वाजायला हव्यात, आमचे छंद वाजायला हवेत. हे सर्व कसं करता येईल, याचा विचार करून मग 'मुंबई स्टँप'ची रचना झाली. ती ऐकायला छान आणि मनोरंजक वाटते, पण त्यात नुसतं बडवलेलं नाहीये. त्यामध्ये परंपरेनं चालत आलेले वेगवेगळे ताल आहेत, प्रत्यक्ष लयीचं काम चाललं आहे. त्यात कोरवई, गत, रेले, चक्रधार आली आहे. यातून माझं भारतीय संगीतच पाझरायला हवं, असा माझा आग्रह होता.माझे अनेक विद्यार्थी या मुंबई स्टँपचा हिस्सा होते. त्यांनी वाजवताना एक चौकट स्वीकारून त्या चौकटीअंतर्गत वादन करावं असं माझं म्हणणं होतं. ते त्यातून अवतरलं.आता माझ्या प्रयोगशीलतेला नवे धुमारे फुटू लागले होते. माईकचा वापर करून मुखावाटे विविध आवाज निर्माण करून एखादं कथानक सांगायचा माझा प्रयत्न असे. त्यात नुसता 'हाऽ हाऽ' नसतो. त्यातून माझ्या अब्बाजींकडून प्राप्त झालेली तालविद्या रसिकांपर्यंत पोहोचवण्याचा यत्न असतो. त्यातही कायदे, रेले, चक्रधार सादर करून रसिकांपर्यंत पोहोचायचा विनम्र प्रयत्न असतो. आपली भूमी सोडून उगाच उड्या मारायला का जायचं?माझ्या व्यावसायिक कार्यक्रमांत मी माझ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या सादरीकरणासाठी बोलावतो. अब्बाजींनी एकदा सांगितलं होतं, 'तुला विलंबित कसा वाजवायचा हे मी सांगू शकतो, पण तो तुला तेव्हाच अवगत होईल, जेव्हा तू स्वतः विलंबित वाजवशील.' संगीतकला ही सादरीकरणाची कला आहे. कथा-कविता असं ललित साहित्य निर्माण करताना तुम्हाला शब्द खोडून नवं लिहिता येतं, पण संगीत, नृत्य, नाट्य या सादरीकरणाच्या कलांमध्ये प्रत्यक्ष सादरीकरणात सुधारणेला संधी नसते, जी संधी असते ती सादरीकरणापूर्वीच. त्यामुळे माझ्या विद्यार्थ्यांना मी माझ्या सोबत रंगमंचावर उभं करतो, मध्येच त्यांना त्यांचं वाद्य वाजवण्यासाठी निमंत्रण देतो. रंगमंचीय अनुभव हा रंगमंचावरच मिळतो. अशा वेळी त्यांना मी सांगतो की, 'चुकलात तरी काळजी करू नका; कार्यक्रम माझा आहे, लोक मला दोष देतील. पण चांगलं वाजवलं की त्याचा अनुभव तुम्हाला मिळेल, रसिकांची नाडी कशी पकडायची, त्यांना रिझवायचं कसं, त्यांचं मन कसं जिंकायचं हे तुम्हाला कळेल; तुमचं श्रेय हे तुमचं असेल आणि त्यातून तुम्ही उभे राहाल.'माझ्याकडे शिकायला येणारा विद्यार्थी हा पर्कशन कीटमधली वेगवेगळी तालवाद्यं वाजवायला शिकतो, त्याचबरोबर तो झेंबे वाजवायलाही शिकतो. हे विद्यार्थी आवश्यक ते कौशल्य आत्मसात करतात आणि उपजीविकेचं साधन म्हणून त्यांचा वापर करू लागतात. माझा एक विद्यार्थी उत्तम ढोल वाजवत असे. एकदा झाकीरभाईंनी मला विचारलं, 'मला एका ढोलवादकाची गरज आहे, तुझा एखादा विद्यार्थी पाठवशील का?' मी त्या मुलाला पाठवलं. झाकीरभाईंनी त्याचं कौशल्य पाहून त्याला 'मास्टर ऑफ पर्कशन'ची टूर केली. काही विद्यार्थी सिनेमा जगतात आहेत. एकदा संगीतकार प्रीतम मला म्हणाला, 'मला एका झेंबेवादकाची गरज आहे. बजेट फारसं नाहीये, तू मला तुझा एखादा चांगला विद्यार्थी दे.' मी एका विद्यार्थ्यांचं नाव त्याला दिलं, आता तो मुलगा सिनेसंगीताच्या जगतात प्रतिष्ठित झाला. तुम्हाला सांगायला मला आवडेल की, माझे अनेक विद्यार्थी आता ऱ्हीदम संयोजन करतात, प्रोग्रॅमिंग करतात.एखादा साऊंड इंजिनिअर कधी तरी भेटतो व सांगतो, 'तुमच्या त्या अमुक विद्यार्थ्यानं आज रेकॉर्डिंगच्यावेळी मजा आणली. त्यानं असा जबरदस्त साऊंड दिला की तुमची आठवण आली.' हे पाहून, ऐकून छान वाटतं! मुलं मोठी होऊ लागली याचा आनंद वाटू लागतो. कोणी विचारलं की 'फारसा बिझी नाहीस तू', तर माझं उत्तर असतं, 'हां, फारसा बिझी नाही. आजकाल माझी मुलं जास्त बिझी असतात.' या मुलांकडून मी कधीही एका पैशाचीही अपेक्षा बाळगली नाही. जसा माझा मुलगा शिखरनाद तसेच हे सारे. नऊ ऑगस्टला माझा वाढदिवस असतो; ही सारी पोरं आठ ऑगस्टच्या मध्यरात्री घरी येतात, केक कापतात, रात्रभर काही तरी सुरू असतं. आम्ही कधी कधी पिकनिकला जातो. अशा पिकनिक हे एक प्रकारचं मुक्त गुरूकुल असतं. काही वर्षांपूर्वी आम्ही लोहगडला गेलो होतो, गड चढता चढता वेगवेगळे ताल बोलणं, त्यांच्या विविध रूपांचा वेध घेणं सुरू होतं. धमाल होती.खरं सांगू का? मी माझ्या स्वभावाप्रमाणे कोणत्याही वेगवेगळ्या तालांचा शोध घेतला तरी अंतर्यामी कानांत गुंजणारे अब्बाजींचे बोल असतात. त्यांच्या आवाजातला ताल माझ्या हृदयाची लय घडवत असतो.

## वसई-विरारचा मानवनिर्मित महापूर ...पान न.१

व्यापारी, शाळा व्यवस्थापन आणि रुग्णालय चालक यांनीही त्याचप्रमाणे नाराजी दर्शवली. त्यांचे म्हणणे आहे की महापालिकेने वेळेवर योग्य नालेसफाई केली असती तर आज ही परिस्थिती उद्भवलीच नसती.नागरिकांच्या मागण्या स्पष्ट आहेत. सर्व नालेसफाई कंत्राटदारांना तात्काळ ब्लॅकलिस्टमध्ये टाकावे, त्यांच्या थकबाकीचे पेमेंट रोखावे, भ्रष्ट VVMC अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करावी आणि दरवर्षी चालणाऱ्या या भ्रष्ट कंत्राटी लुटीची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींना तुरुंगात डांबावे, अशा मागण्या नागरिकांनी केल्या आहेत.दरम्यान, VVMCकडून काही उपाययोजना करण्यात आल्या. महापालिकेने तातडीने बचाव पथके राबवून ४९७ नागरिकांचा बचाव केला. ३४ ठिकाणी तात्पुरती मदत केंद्रे स्थापन करण्यात आली. ५४ सक्शन पंप आणि व्ँ मशिन्सचा वापर करून पाणी उपसण्याचे काम करण्यात आले. तसेच बोळिंज, नालासोपारा पश्चिम, चंदनसार, आचोळे, पेल्हार, वाळिव नाका, नवघर-माणिकपूर आणि वसई गाव या ठिकाणी वेगवेगळे हेल्पलाईन क्रमांक जारी करून नागरिकांना त्वरित मदत मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र या उपाययोजना उशिराने आणि अपुऱ्या प्रमाणात झाल्यामुळे संतप्त नागरिकांनी त्यावरही नाराजी व्यक्त केली.या घटनेतील सर्वात लाजिरवाणी बाब म्हणजे VVMCचे स्वतःचे मुख्यालयसुद्धा सलग दोन दिवस पाण्यात बुडाले. ज्या महापालिकेने भ्रष्ट ठेकेदारांना नालेसफाईचे कंत्राट दिले, त्या महापालिकेचे स्वतःचे कार्यालयही पूरातून वाचवता आले नाही. अधिकारी आणि कंत्राटदारांच्या भ्रष्ट कारभारामुळे नागरिकांबरोबरच VVMCचे मुख्यालयही जलमय झाले. हा प्रकार थेट VVMCच्या भ्रष्ट कारभाराचे वास्तव नागरिकांसमोर आणणारा ठरला. महापालिकेचे स्वतःचे कार्यालयच पूरग्रस्त झाले, तर सामान्य नागरिकांचे रक्षण कसे करणार, असा सवाल लोक करत आहेत.या घटनेनंतर नागरिकांचा संताप उफाळला असून त्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की यंदा तरी दोषींवर कठोर कारवाई झाली नाही, तर वसई-विरारमध्ये भव्य जनआंदोलन उभारले जाईल. दरवर्षीचा हा मानवनिर्मित पूर थांबवण्यासाठी भ्रष्ट अधिकारी-कंत्राटदारांना तुरुंगात डांबणे हा एकमेव पर्याय असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. लाखो-कोटींचा निधी गिळंकृत करून नागरिकांना दरवर्षी हालअपेष्टा सोसण्यास भाग पाडले जाते, ही लोकशाहीची थट्टा आहे आणि अशी लूटयंत्रणा आता जनतेने अजिबात सहन केली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश नागरिकांनी दिला आहे.

## धोकादायक नाल्याच्या स्लॅबवर ठेकेदाराचे कार्यालय ...पान न.१

गर्दी आणि एवढा मोठा साठा असणे म्हणजे मोठा अपघात घडवून आणण्याचे आमंत्रण असल्याचे नागरिकांनी स्पष्ट केले आहे.नाल्याचा स्लॅब कधीही कोसळू शकतो, अशा स्पष्ट सूचना महापालिकेच्या अधिकाऱ्यांनीच दिल्या आहेत. तरीही या आदेशाला जाणीवपूर्वक डावलून ठेकेदाराच्या सुरक्षेसाठी खास परवानगी मिळाली आहे का, हा सर्वात मोठा प्रश्न शहरवासीयांनी केला आहे.या परिसरात गोंसालो गासिया महाविद्यालय आहे, जिथे हजारो विद्यार्थी दररोज शिक्षणासाठी येतात. शेजारी अभ्यासिका व वाचनालय देखील असल्याने विद्यार्थ्यांचे व अभ्यासकांचे जीव धोक्यात आले आहेत. अपघात घडल्यास थेट विद्यार्थी व सर्वसामान्य जनता बळी पडणार हे स्पष्ट असून, 'ही जनतेच्या आयुष्याशी खेळण्याची परवानगी कोणत्या बदल्यात मिळाली?' असा ज्वलंत सवाल पालक व नागरिक विचारत आहेत. सामान्य हॉकर्सना पोटासाठी रस्त्यावर विक्री करू दिली जात नाही. त्यांच्यावर कारवाई करत महापालिका रोज लाखो रुपयांचा दंड वसूल करते. त्यांचे सामान रस्त्यावर फेकले जाते. पण दुसरीकडे ठेकेदारांना मात्र धोकादायक स्लॅबवरही कार्यालय सुरू ठेवण्याची मुभा दिली जाते. ही उघड उघड दुहेरी भूमिका आहे. ठेकेदारांनी 'वरच्या स्तरावर' पोहोचवलेले पैसे व प्रभाव यामुळेच हे शक्य होत असल्याचा सर्रास आरोप केला जात आहे.'महापालिका ही जनतेची आहे की ठेकेदारांची?' हा प्रश्न आता प्रत्येकाच्या ओठांवर आहे. कारण जिथे सामान्य माणूस चुकीला आला तर महापालिकेचा दंड ताबडतोब बसतो; पण जिथे ठेकेदार उघडपणे नियम तोडतो तिथे मात्र कारवाई न होता आशीर्वाद मिळतो.महापालिकेचे ९ प्रभाग व २० झोन अशा प्रचंड मोठ्या क्षेत्रात औषधफवारणीचे काम पाहणाऱ्या ठेकेदाराला अशी 'व्हीआयपी वागणूक' मिळते म्हणजे ठेकेदारांच्या गाठीशी किती ताकद आहे हे उघड आहे. एका बाजूला सर्वसामान्य जनता दिवसेंदिवस वाढत्या कर, दंड, वसुलीला कंटाळली आहे आणि दुसरीकडे ठेकेदार मात्र महापालिकेवरच दबाव टाकून हव्या त्या जागा, सुविधा, परवानग्या मिळवत आहेत.पूर्वीच्या आयुक्तांच्या कारकिर्दीत ठेकेदारच सर्वोच्च झाले होते, असा नागरिकांचा अनुभव आहे. त्यामुळे नव्या आयुक्तांकडून या प्रकरणी काय पावले उचलली जातील याकडे शहरवासीयांचे डोळे लागले आहेत. मात्र, पूर्वसुरींप्रमाणेच जर ठेकेदारांचे गोडवे गाणे आणि त्यांच्या मनासारखे निणय घेणेच सुरू राहिले, तर जनता आयुक्तांवरील विश्वास गमावेल, असा सूर शहरात उमटत आहे.महापालिकेचे कार्यालय आहे की ठेकेदारांची पाठराखण करणारे ठिकाण? जनता विचारते आहे, पण उत्तर मात्र कुणाकडेच नाही.

## सामान्य नागरिकांच्या कोट्यवधी टॅक्सच्या...पान न.४

उपाययोजना आणि विकासाच्या मागण्यांसह गेल्या १५ वर्षांत वसई-विरारमध्ये झालेल्या उपाययोजनांमध्ये सर्वेक्षणाच्या नावाखाली १०० कोटींचा घोटाळा झाल्याचा आरोप केला. तसेच चौकशी आणि ऑडिटची मागणी करणारे पत्र मुख्यमंत्री आणि मुख्य सचिव यांना दिले, पण आजपर्यंत कोणतीही कारवाई झालेली नाही ।वसई-विरारमध्ये सामान्य नागरिक आजही मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करत आहेत आणि भ्रष्टाचारामुळे त्यांच्या पैशांची उधळपट्टी होत आहे, असे आरोप सतत होत आहेत । जलभराव उपाययोजनेसाठी आयआयटी मुंबई आणि निरीहला दिलेले २० कोटी तांत्रिक अहवालासाठी असल्याचे सांगण्यात आले. याशिवाय इतर अनेक महत्त्वाच्या कामांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे पदाधिकारी नागरिकांच्या हक्कासाठी आणि शहराच्या विकासासाठी मनपा आयुक्त मोफत अहवाल देतील. त्यात पीपीपी मॉडेलवर काम, केंद्र सरकारच्या विविध योजनांतून उपाययोजना आणि विकासासाठी काम करण्याचा अहवाल असेल. शासन-प्रशासन गंभीर असेल आणि काम करण्याची इच्छा शक्ती दाखवत नागरिकांच्या हितासाठी चर्चेला बोलावतील, तर उपाययोजनेवर मोफत अहवाल दिला जाईल. परंतु अट अशी की ठोस आश्वासन आणि लेखी उत्तर दिले जावे ।सध्या जलभराव उपाययोजनेवर आयआयटी मुंबई आणि निरीहच्या अहवालानुसार जे काम झाले नाही आणि ज्यामुळे नागरिकांना प्रचंड हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या,काही व्यक्ति च मृत्यु झाला आणि घायल सुद्धा झाले त्या पीडित कुटुंबांना आर्थिक नुकसानभरपाई व एका ला नॉकरी आणि टॅक्समध्ये माफी द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी कांग्रेस शरद पवार पार्टी वसई विरार शहर जिल्हा मीडिया प्रमुख कमर बेग व पदाधिकारी मांगनी करत आहे । तसेच जलभराव 'उपाययोजना वर तातडीने काम करा नाहीतर खुर्ची खाली करा' या घोषणेसह गणेश विसर्जनानंतर पक्षाचे पदाधिकारी याबाबत विचारविनिमय करून तारीख व वेळ निश्चित करून मनपा मुख्यालयासमोर मोठे आंदोलन करतील आणि नागरिकांना जागरूक करण्याची मोहीम राबवतील । असी सूचना पक्षा चे मीडिया प्रमुख कमर बेग द्वारे प्रेस नोट मध्ये देण्यात आला आहे ।

## वसई-विरारमध्ये धक्काः प्रारूप प्रभाग रचना जाहीर - २९ प्रभाग, ११५ नगरसेवक

### पर्व मिळणार प्रशासकीय नियंत्रणाला, पाच वर्षांनंतर येणार निवडणुकीचा उत्साह

वसई-विरार महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या मोर्चावर प्रारूप प्रभाग रचना शुक्रवारी संध्याकाळी जाहीर करण्यात आली. या आराखड्यानुसार २९ प्रभाग, जिथे एकूण ११५ नगरसेवक निवडणार आहेत, अशी रूपरेषा तयार करण्यात आली आहे

महत्त्वाच्या बाबी

३५ हजार ते ४५ हजार लोकसंख्येच्या आधारावर प्रत्येक प्रभागात ४ नगरसेवक असतील, तर एक विशेष प्रभागात ३ सदस्यांचा समावेश असेल

हा आराखडा नगरविकास मंत्रालयाकडे मान्यतासाठी पाठविण्यात आला असून, आता जाहीर करण्यात आला आहे

नागरिकांना ४ सप्टेंबर २०२५ पर्यंत या आराखड्यावर हरकती (शेरा) व सूचना संमिलित करण्याचे आमंत्रण देण्यात आले आहे

२०१५ साली नगरसेवकांची संख्या ११५ होती आणि प्रभाग एक सदस्यीय रचनेत होते.

कोरोनाच्या संकटामुळे निवडणुका पाच वर्षांपर्यंत लांबणीवर पडल्या; अखेर आता हे प्रशासनिक संकट संपणार आहे

यापूर्वी १२६ सदस्यांसाठी ४२ त्रिसदस्यीय प्रभाग रचनेची तयारी केली होती, पण ती अंमलात आली नाही

पाच वर्षांनंतर, राजकीय पक्षांमध्ये उत्साह दिसू लागला आहे, मोर्चेबांधणी सुरु झाली आहे आणि लोकांमध्ये निवडणुकीची उमेद जागृत झाली आहे

यावेळी बविआ (बहुजन विकास आघाडी) आणि **BJP** यांच्यात थेट स्पर्धा होण्याची अपेक्षा असताना, वसई-विरारमध्ये राजकीय चढाओढ रंगू शकते

सारांशाचे मुद्दे

| मुद्दा | तपशील |
|---|---|
| प्रभाग संख्या | २९ |
| नगरसेवक संख्या | ११५ |
| प्रत्येक प्रभागात | ४ सदस्य (२८ प्रभाग), ३ सदस्य (१ प्रभाग) |
| हरकतीची अंतिम तारीख | ४ सप्टेंबर २०२५ |
| राजकीय वातावरण | उत्साह, बविआ–**BJP** स्पर्धा |
| | निष्कर्षाचा प्रश्न |

पाच वर्षांच्या प्रशासक राजीनंतर वसई-विरारचे निवडणूक रणभूमीवर भारतभक्तीतील प्रदेश आता पुन्हा जोडले जात आहेत — पुढच्या महापालिका निवडणुकीत लोकांची निणयशक्ती कसोटरी बदल घडवेल का?

## सावंत मेहरबान, झा झाला पहलवान?

### वसई-विरार महानगरपालिकेच्या एफ प्रभागात अवैध बांधकामांचा सुळसुळाट

#### परमार इंडस्ट्रियल परिसरात 'भूमाफिया'चे हात मोकळे?

वसई-विरार :महानगरपालिकेच्या एफ प्रभाग समिती हद्दीत परमार इंडस्ट्रियल परिसरात गेल्या काही दिवसांत अवैध बांधकामांना मोठ्या प्रमाणावर ऊत आला आहे. स्थानिक नागरिकांच्या तक्रारीनंतरही कारवाई न झाल्याने प्रशासनावर थेट संरक्षणाचे आरोप होत आहेत. नागरिकांच्या मते, परमार इंडस्ट्रियल परिसरात काही बांधकाम करणारे स्वतःला वरिष्ठ अधिकाऱ्यांचे 'नातलग' असल्याचे सांगत दबाव टाकत आहेत. त्यामुळे क्षेत्रीय पातळीवर नियमबाह्य इमारती उभ्या राहत असून, प्रशासन त्याकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत असल्याची चर्चा आहे. स्थानिक कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की, प्रभागीय अधिकारी व काही वरिष्ठ अधिकारी बांधकाम पाडण्याऐवजी त्यांना मौन समर्थन देत असल्याचे चित्र दिसत आहे. 'पूर्वीच्या कारभाराप्रमाणेच आता आणखी वेगाने अवैध बांधकामे वाढत आहेत. एवढेच नव्हे तर भ्रष्टाचाराच्या माध्यमातून या इमारतींना संरक्षण मिळते,' अशी टीका नागरिक करत आहेत.सूत्रांचे म्हणणे आहे की, परमार इंडस्ट्रियल



परिसरातील बांधकामांच्या बदल्यात मोठा आर्थिक व्यवहार झाल्याची कुजबुज आहे. या प्रकरणात 'पैसे देऊन पद मिळवले, तर पैसे कमवायलाच हवेत' अशी वाक्यं अधिकाऱ्यांच्या नावावर फिरत असल्याने प्रशासनातील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या संपूर्ण प्रकारामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. 'महानगरपालिका नियम मोडून कशी काय बांधकामे सुरू राहतात? ईडी किंवा अन्य यंत्रणांना अजिबात भीती का वाटत नाही?' असा सवाल नागरिक विचारत आहेत.एफ प्रभागातील परमार इंडस्ट्रियल परिसरात अवैध बांधकामांची वाढस्थानिक नागरिकांच्या तक्रारींनंतरही कारवाईचा अभावभ्रष्टाचार आणि संरक्षणाच्या आरोपांनी प्रशासन अडचणीत कायदा सर्वांसाठी सारखाच असावा' अशी नागरिकांची मागणी

## लघवीमध्ये फेस दिसणं किती धोकादायक? किडनीत दोष असल्याची ५ लक्षणं कोणती?

किडनी किंवा मूत्रपिंड आपल्या शरीरात एकाचवेळी अनेक कामं करते. ती शरीरातील घाण आणि नको असलेले पदार्थ बाहेर काढते आणि शरीरातील पाणी व खनिजांचं संतुलनही राखते.

किडनी आपला रक्तदाब किंवा ब्लड प्रेशर नियंत्रणात ठेवते आणि रक्तातील लाल पेशी तयार करण्यासही मदत करते.

परंतु, किडनीची समस्या सुरू झाल्याची सुरुवातीची लक्षणं लोक बहुतेक वेळा दुर्लक्षित करतात किंवा त्यांच्याकडून चुकून दुर्लक्ष होतं.जर वेळेवर ही लक्षणं ओळखली तर मूत्रपिंडाच्या आजारावर लवकर उपचार सुरू करता येऊ शकतात.

चला पाहूया अशीच पाच लक्षणे, ज्याकडे आपण अनेकदा दुर्लक्ष करतो. ही किडनीच्या आजाराची किंवा खराब होण्याची शक्यता असू शकते.१. वारंवार लघवी येणंलघवी लवकर-लवकर किंवा वारंवार येणं हे किडनी खराब होण्याचं लक्षण असू शकतं. याला 'पॉलीयुरिया' असं म्हणतात.जेव्हा किडनी खराब होते, तेव्हा आवश्यकतेपेक्षा लघवी कमी येऊ लागते. लघवीत फेस येणं हे त्याचं एक लक्षण असू शकतं.परंतु, लघवीत येणारा फेस हा मूत्रपिंड खराब असल्यामुळेच येतो असंही नाही. इतर आजारांमुळेही लघवीत फेस येऊ शकतो, असं सर गंगाराम रुग्णालयातील सीनियर कन्सल्टंट डॉ. मोहसीन वली सांगतात.२. शरीराला सूज येणे डोळे आणि पाय सुजणे हे किडनी किंवा मूत्रपिंड खराब होण्याचं लक्षण असू शकतं.

घोट्याला आणि पिंडऱ्यांमध्ये सूज दिसल्यास दुर्लक्ष करू नये. हे किडनीच्या आजाराचे संकेत देतात.मणिपाल रुग्णालयातील कन्सल्टंट नेफ्रोलॉजिस्ट डॉ. गरिमा अग्रवाल सांगतात की, पाय सुजल्यास सावध व्हावं. डोळे, चेहरा आणि पाय सुजणं ही किडनीच्या आजाराची चिन्हं असू शकतात.३. ब्लड प्रेशर / रक्तदाबतज्ज्ञांच्या मते, रक्तदाब ही दुधारी तलवार आहे. उच्च रक्तदाबाचा किडनीवर परिणाम होतो.त्याचबरोबर किडनी खराब झाल्यामुळेही ब्लड प्रेशर वाढतो. त्यामुळे रक्तदाब किंवा ब्लड प्रेशरबाबत सावध राहणं आवश्यक आहे.डॉ. गरिमा अग्रवाल सांगतात की, काही वेळा रक्तदाब नियंत्रणात राहत नाही आणि औषधांचा डोस वाढवावा लागतो. हेही किडनीच्या आजाराचं लक्षण असू शकतं.४. मधुमेहमधुमेहामुळे किडनीवर सर्वाधिक परिणाम होतो.डॉ. गरिमा अग्रवाल सांगतात की, किडनीचे ८० टक्के रुग्ण हे मधुमेहानं ग्रस्त आहेत.३० ते ४० टक्के मधुमेहाच्या प्रकरणात किडनीवर परिणाम होतो.मधुमेहानं ग्रस्त लोकांमध्ये किडनीचा आजार वाढू लागला तर त्यावेळी त्यांची शुगर किंवा साखरेची पातळीही कमी होते.अनेक वर्षांपासून साखरेची पातळी वाढल्यामुळे मूत्रपिंडाचा म्हणजेच किडनीचा आजार होऊ लागतो.५. थकवा, खाज सुटणे आणि मळमळ थकवा, शरीराला खाज सुटणं आणि मळमळ होणं हे किडनीच्या आजाराचे संकेत असू शकतात.तज्ज्ञांच्या मते, शरीरातील फॉस्फरस कमी झाल्यास खाज येते. किडनीच्या आजारामुळे शरीरातील फॉस्फरस कमी होतो.

किडनीच्या आजारामुळे काही रुग्णांना मळमळ होते आणि त्यांना काहीही खाण्याची इच्छा होत नाही तज्ज्ञांच्या मते, निरोगी जीवनशैली किडनीच्या आजारापासून बचाव करण्यासाठी खूप उपयुक्त ठरते. त्यांचं म्हणणं आहे की, नियमित व्यायाम करणं, पुरेसं पाणी पिणं आणि मीठ व साखरेचा कमी वापर करणं किडनीचा आजार टाळण्यासाठी उपयुक्त आहे.डॉ. मोहसीन वली आणि डॉ. गरिमा अग्रवाल यांनी बीबीसीला काही असे उपाय सांगितले, ज्यांमुळे किडनीच्या आजारापासून आपल्याला बचाव करता येऊ शकतो.पुरेसं पाणी प्या

निरोगी किडनीसाठी पाणी खूप महत्त्वाचं आहे. जेव्हा आपण पुरेसं पाणी पितो, तेव्हा किडनी पुरेशी लघवी तयार करतं, ज्यामुळे शरीरातील हानिकारक पदार्थ बाहेर पडतात.यामुळे किडनीत खडे किंवा स्टोन आणि संसर्ग होण्याचा धोका कमी होतो. जर आपण पुरेसं पाणी पित असू, तर आपली लघवी स्वच्छ किंवा हलक्या पिवळसर रंगाची होईल.साधारणपणे एका दिवसात २ ते २.५ लिटर पाणी पिलं पाहिजे, असं डॉ. गरिमा अग्रवाल सांगतात.

मीठ कमी खा जास्त मीठ किडनीसाठी चांगलं नाही. कारण यामुळे रक्तदाब वाढतो आणि किडनीला हानी पोहोचते. लोणचं, पापड आणि प्रोसेस केलेलं अन्न टाळा. नूडल्स, चाऊमीनसारख्या पदार्थांमध्ये मीठ खूप असतं. असे पदार्थ टाळा.

सैंधव मीठ वापरू नका हल्ली सैंधव मीठ खाण्याचा ट्रेंड सुरू आहे. परंतु, उच्च रक्तदाबाच्या रुग्णांनी सैंधव मीठ खाणं टाळलं पाहिजे.डॉ. मोहसीन वली सांगतात की, साधारणपणे असं मानलं जातं की सैंधव मीठ साध्या मीठापेक्षा आरोग्यासाठी चांगलं असतं. परंतु, यामध्ये पोटॅशियम कमी आणि सोडियम जास्त असतं.साखर कमी करा किडनीच्या आजारापासून वाचायचं असेल तर गोड कमी खा.साखर न खाणं खूप चांगलं आहे. केक, कुकीज, पेस्ट्री आणि कोलासारख्या पदार्थांमध्ये प्रोसेस्ड साखर असते.साखरेमुळं लठ्ठपणा वाढतो आणि यामुळे किडनीचा आजार बळावण्याचा धोका असतो.वजनावर नियंत्रण ठेवा

तज्ज्ञांचं म्हणणं आहे की, वजन कमी करा. कारण जास्त वजन किंवा लठ्ठ असलेल्या लोकांना किडनीच्या आजाराचा धोका जास्त असतो.बॉडी मास इंडेक्स (बीएमआय) कमी ठेवा. ते २४ पेक्षा कमी असेल तर खूप चांगलं आहे.हलका शारीरिक व्यायाम आवश्य करा. हे फार महत्वाचं आहे. यामुळे शरीराची पचनक्रिया (मेटाबॉलिज्म) चांगली राहते.

जर हे चांगले राहिलं, तर वयाच्या पन्नाशीच्या आसपास पोहोचाल तेव्हा मधुमेह आणि रक्तदाबाचा धोका कमी असेल.

संतुलित आहार घ्या फळं, भाज्या आणि कड धान्यं यांचा भरपूर समावेश असलेला आहार घ्या. प्रोबायोटिक पदार्थ आरोग्यासाठी चांगले असतात, त्यांना प्राधान्य द्या. तळलेले आणि भाजलेले पदार्थ टाळा.पुरेशा प्रमाणात पाणी पिणं, संतुलित आहार आणि व्यायाम केल्यास किडनी निरोगी राहते आणि संपूर्ण आरोग्य चांगलं राहतं.

डॉक्टरांना विचारल्याशिवाय औषधं घेऊ नका डॉ. गरिमा अग्रवाल सांगतात, 'अनेक वेळा आपण पाहतो की, लोक डॉक्टरांचा सल्ला न घेता मेडिकलमधून परस्पर औषधं घेतात.डॉ. अग्रवाल म्हणतात की, सर्वात जास्त लोक पेनकिलर घेतात.त्यांच्या मते, "वृद्ध लोक अनेकदा शरीरदुखी आणि आर्थरायटिसमध्ये (सांधेदुखी) पेनकिलर घेतात. काही औषधांमध्ये जड धातू (हेवी मेटल्स) आणि स्टेरॉइड्स असू शकतात. त्यामुळे किडनी खराब होऊ शकते."

# सामान्य नागरिकांच्या कोट्यवधी टॅक्सच्या पैशांची झाली उधळपट्टी

## जलभराव उपाययोजनेवर तातडीने काम करा नाहीतर खुर्ची खाली करा, एनसीपी एसपी पक्षाची मांगना

**जलभराव उपाययोजनांवर काम न झाल्यामुळे जबाबदार अधिकाऱ्यांमुळे घरांमध्ये व दुकानांत अनेक दिवस पाणी साचले. शेवटी लोकांना प्रचंड आर्थिक, मानसिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागला. यासाठी जबाबदार कोण?**



विरार । या वर्षीही १६ ऑगस्ट २०२५ पासून सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे वसई-विरारमध्ये मोठ्या प्रमाणात जलभराव झाला. सामान्य नागरिकांच्या घरांत आणि दुकानांत अनेक फूटपर्यंत पाणी भरले. यामुळे लोकांना प्रचंड शारीरिक, मानसिक आणि आर्थिक हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या । रोड वर कुठे ३ फूट तर कुठे ४ फूट पाणी साचलेले दिसून आले. घरांत पाणी शिरल्यामुळे लोकांची मोठी कुचंबणा झाली होती । लहान मुले रडत होती, वृद्ध असहाय्य झाले होते, सर्व बाजूंनी जणू संकटांचे डोंगरच कोसळले होते. वीजपुरवठा खंडित झाला होता, अन्नधान्याची टंचाई झाली होती, इतकेच नव्हे तर पिण्याचे पाणी मिळणेही कठीण झाले होते. अशा भीषण परिस्थितीत शासन-प्रशासनाकडून काही ठिकाणी कोणीही दखल घेतली नाही ।सामान्य नागरिकांना हे माहित नव्हते की त्यांनी भरलेला टॅक्स त्यांना मूलभूत सुविधा मिळवून द्यायला हवा होता, जो त्यांचा हक्क होता. पण त्यांच्याच पैशांची उधळपट्टी करण्यात येत होती. जलभराव हा नवा विषय नाही. २०१७ आणि २०१८ च्या जलभरावाच्या वेळी सत्ताधारी पक्ष आणि प्रशासनाने जलभराव उपाययोजनांसाठी आयआयटी मुंबई आणि निरीह संस्थेला काम दिले होते. त्यांनी काही महिन्यांत सर्वेक्षण अहवाल सादर केला आणि कुठे काय कामे करावी लागतील हे स्पष्ट केले. या सर्वेक्षण आणि अहवालासाठी सुरुवातीला १२ कोटी आणि नंतर ८ कोटी, असे एकूण २० कोटी रुपये देण्यात आल्याची माहिती मिळते. हे पैसे सामान्य नागरिकांच्या टॅक्सच्या पैशांतून देण्यात आले होते । पण नेहमीप्रमाणेच सर्वेक्षण अहवाल (जो स्वतः एक घोटाळा मानला जातो) दिल्यानंतरसुद्धा उपाययोजनेवर कोणतेही काम करण्यात आले नाही. याचा खुलासा पत्रकार तसेच एनसीपी एसपी पक्षाचे पदाधिकारी कमर बेग यांनी आरटीआयद्वारे केला होता. सर्वेक्षण अहवालात नायगाव ते वसई, नालासोपारा आणि विरार या भागात एकूण ८ कल्व्हर्ट्स बांधण्याची सूचना केली होती. ३ ठिकाणी होल्डिंग पॉंड (पूराचे पाणी साठवण्याची सोय) बांधायचे होते. त्यापैकी नालासोपारा चौथा रोड शनी मंदिराजवळ अनेक एकर जागेवर पॉंड बांधायचे ठरले होते. तिथे सूचना फलकसुद्धा लावण्यात आला होता. पण फलक लावल्याच्या एका महिन्याच्या आत

तो काढून टाकण्यात आला. याची माहिती कार्यकारी अभियंता पासून ते विभागीय सहाय्यक आयुक्तांपर्यंत दिली होती, पण कोणतीही कारवाई झाली नाही । विश्वस्त अधिकारी सूत्रांच्या माहितीनुसार, सर्वेक्षणासाठी दिलेले २० कोटी प्रत्यक्षात २ कोटींचेही नव्हते. म्हणजेच प्रत्येक सर्वेक्षणात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचा आरोप आहे. अशाच इतर सर्वेक्षण अहवालांवरही काही काम झाले नाही । एनसीपी एसपी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी २५ जुलै २०२४ रोजी मुसळधार पावसात भिघुन मनपा मुख्यालयासमोर आंदोलन केले होते. यात नागरिकांच्या मूलभूत सुविधा, इतर पान नं.२वर

# वसईत मनसे नेते अविनाश जाधव यांना शिवसेना पदाधिकाऱ्यांची सदिच्छा भेट



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते श्री. अविनाश जाधव हे वसई (पश्चिम) येथे एका कार्यक्रमानिमित्त आले असता, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नवघर-माणिकपूर विभागाचे माजी उपशहरप्रमुख श्री. मिलिंद चव्हाण यांनी त्यांची सदिच्छा भेट घेतली.या प्रसंगी मा. शाखाप्रमुख श्री. सुशांत धुळप, श्री. हरीश बिष्ट, श्री. मुरतूझा मिठाईवाला तसेच श्री. प्रसाद वर्तक उपस्थित होते.या भेटीदरम्यान परस्परांमध्ये स्नेहपूर्ण संवाद झाला. तसेच स्थानिक पातळीवरील विविध सामाजिक आणि राजकीय घडामोडींवरही चर्चा झाल्याचे समजते.









# संविधान आर्मीच्या वतीने १५ ऑगस्ट रोजी दादर चैत्यभूमी रेल्वे स्टेशन नामांतर मागणीसाठी रेल रोका आंदोलन,



संविधान आर्मीच्या वतीने राष्ट्रीय अध्यक्ष जगन भाई सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली दिनांक १५ ऑगस्ट रोजी दादर येथील रेल रोको आंदोलन करण्यात आले दादर चैत्यभूमीस चे नाव दादर रेल्वे स्टेशनला मिळावे शेतकऱ्यांचे प्रश्न तसेच अध्यक्ष गायकवाड यांच्यावर झालेले मारहाणीचे निषेध अशा विविध प्रश्नासाठी ऑल इंडिया संविधान आर्मीच्या तर्फे मुंबई दादर येथे राज्य आक्रोश रेल आंदोलन करण्यात आले यावेळेस डॉ,रामदास भाऊ ताटे यांचे उपस्थितीमध्ये हे आंदोलन करण्यात आले. रामदास भाऊ ताटे यांच्या मार्गदर्शनाखाली दादर रेल्वे स्टेशन वरती रेल रोको करण्यात आले तसेच त्यानंतर पोलीस बंदोबस्त जीआरपीएफ सीआरपीएफ रेल्वे पोलीस सिटी पोलीस मुंबई पोलीस हे मोठ्या प्रमाणात त्या ठिकाणी उपस्थित होऊन आंदोलन करताना आंदोलन सर्वांना दादर स्टेशनच्या मोकळ्या जागेमध्ये घोषणाबाजी व भाषण करण्यासाठी व घोषणा देण्यासाठी बाहेर दादर स्टेशनच्या प्रवेशद्वाराजवळ आंदोलन करण्याचे विनंती केली म्हणून त्या ठिकाणी घोषणा देण्यात आल्या तसेच विविध मागण्या या ठिकाणी फलक लावून प्रत्येकाच्या आंदोलनकर्त्याच्या हातामध्ये देण्यात आले यावेळी पुणे जिल्हा महिला आघाडी अध्यक्ष ओहोळ ताई तसेच पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष यल्लाप्पा सलून घे या युवा नेते रोहित उर्फ राजू ताटेतसेच इंजिनियर प्रोफेसर करण ताटे सार्थ ताटे स्वारा कांबळे,रामावतार,चौधरीअसे अनेक पदाधिकारी संविधान आर्मीचे यावेळी उपस्थित होतेआंदोलनामध्ये जोरदार पाऊस सुरू असतानाही राष्ट्रीय अध्यक्ष जगन भाई सोनवणे तसेच महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष डॉरामदास भाऊ ताटे युवा हे सर्व भर पावसामध्ये भिजत आंदोलनाची घोषणाबाजी देत होते यावेळी हेमंत करकरे जिंदाबाद असे घोषणा देण्यात आल्या मोदी सरकारच्या विरोधामध्ये घोषणा देण्यात आल्या विविध प्रश्नासाठी हे आंदोलन घेण्यात आले मोठ्या संख्येने महिला व पुरुष संविधान आर्मीचे सर्व पदाधिकारी यावेळेस उपस्थित होते. यावेळी डी आर एम मुंबई रेल्वे स्टेशनचे प्रमुख व पोलिस अधिकारी यांनी हे निवेदन स्वीकारले व रेल्वेमंत्री यांच्यापर्यंत शासनापर्यंत दादर चैत्यभूमी साठी नामांतरासाठी मंजुरी मिळवण्यासाठी प्रयत्न करणार असे त्यांनी सांगितले आहे यावेळी लवकरात लवकर नामांतराचे व विविध मागण्या मान्य न झाल्यास पंधरा दिवसांमध्ये पुन्हा अल्टिमेट रेल रोख आंदोलन मोठ्या प्रमाणात करण्यात येईल असेही यावेळेस राष्ट्रीय अध्यक्ष जगन भाई सोनवणे यांनी यावेळी सांगितले, आभार प्रदर्शन महाराष्ट्र प्रदेश युवा अध्यक्ष डॉ रामदास ताटेयांनी केले

सर्व संविधान आर्मीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी एका हातात तिरंगा व एका हजार संविधान घेऊन रॅलीमध्ये वरील रोको आंदोलनामध्ये सहभागी झाले यामध्ये मोठ्या संख्येने पोलीस बंदोबस्त रेल्वे कडन करण्यात आला होता

सर्व आंदोलन शांत रीतीने पार पडले

परंतु संपूर्ण दादर रेल्वे स्टेशन घोषणांनी दमदुमून गेले होतेआंदोलन झाल्याच्या नंतर सर्व आंदोलन आपापल्या मार्गे व्यवस्थित मार्गस्थ झाले,

## युवाशक्ती एक्सप्रेस कार्यालय- ९८९०८७९७५७

वृत्तपत्रात प्रसिद्ध होणारा मजकूर आलेल्या कागदपत्रांवर आधारित असतो. त्यामुळे प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत कोणाला आक्षेप असल्यास संबंधितांनी योग्य त्या कागदपत्रांसह **युवाशक्ती एक्सप्रेस** कार्यालयाशी संपर्क साधावा. सदर पुरावे योग्य असल्यास संबंधित बातमी बाबतचा खुलासा प्रसिद्ध केला जाईल. या पत्रात प्रसिद्ध होणा-या मजकुराला मुद्रक स्थळ जबाबदार राहणार नाही.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस मते प्रसिद्ध होणा-या कोणत्याही प्रकारच्या जाहिरातींबाबत कुठल्याही प्रकारचा वाद उद्भवल्यास त्याला युवाशक्ती एक्सप्रेस व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वृत्त प्रसिद्धी किंवा अन्य कोणत्याही तत्सम कामासाठी संपादकाशी संपर्क साधायचा असल्यास संबंधितांनी दूरध्वनी कमांक ९८९०८७९७५७ वर संपर्क साधावा.

या नोटीसी द्वारे कळविण्यात येते कि साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणा-या जाहिराती सर्व प्रकारच्या नोटीसी याच्याशी आमचा काहीही संबंध नाही. संबंधित आणि संबंधित व्यक्तीशी परस्पर संबंध साधून त्याबाबत खात्री करावी. साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्र व व्यवस्थापन याला कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

संपादक..

Printed,Published And Owned Tushar Rajratna Gaikwad,printed At Vava ArtsB/8 Dronagiri CHS.,Tanki Road Tulinj (E) Tal-Vasai 401209,Published From Room No.10 Kadarbhai Chawl Sarvoday Vasahat Tnki Road Nallasopara (E) Tal--Vasai Dist-Palghar-401209.Editor-tushar Rajratna Gaikwad
RNI NO.MAHMAR/2016/72543. Mobile-9960144348,9890879757,yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक म्हणून तुषार राजरत्न गायकवाड रु. नं. १०, कादरभाई चाळ, सर्वोदय वसाहत, आंबेडकर नगर, टाकीरोड, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९. ता. वसई, जि. पालघर, येथे प्रकाशित होऊन ९८९०८७९७५७ मे. बाबा आर्टस् बी.०८, मथुरा नगर, द्रोणगिरी अपार्टमेंट, टाकी रोड, साई बाबा मंदिर जवळ, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९ जि. पालघर, महाराष्ट्र येथे मुद्रित करणयात आले. मोबाईल नं. ९९६०१४४३४८
या अंकात प्रसिद्ध झालेलया बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेलया मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद वसई न्यायालयाच्या कक्षेत) Email:yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in